


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ३०३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.१४ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# महाराष्ट्रात मान्सूनचा प्रवास रखडला, आता राज्यावर दुहेरी संकट

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१३, मुंबई :** केरळमध्ये ४ जून रोजी दाखल झाल्यानंतर महाराष्ट्रात मान्सून ६ जून रोजीच आला. त्यामुळे महाराष्ट्रातील इतर राज्यांमधीलही प्रगती वेळेवर होईल असा अंदाज व्यक्त केला जात होता. पण त्यानंतर मान्सूनचा प्रवास मंदावला असून संपूर्ण महाराष्ट्र व्यापण्यासाठी आणखी २ ते ३ दिवसांची प्रतीक्षा करावी लागणार आहे. हवामान विभागाच्या ताज्या अंदाजानुसार, बंगालच्या उपसागरात मान्सूनची आगेकूच सुरूच आहे. गेल्या काही दिवसांमध्ये मान्सून पश्चिम बंगाल, बिहार आणि ओडिशा आणि झारखंडच्या काही भागांमध्ये दाखल झाला आहे.

नेहमी १ जून रोजी दाखल होणार मान्सून यंदा ३ दिवसांच्या विलंबाने केरळमध्ये धडकला. हवामान विभागाने तर मान्सूनआगमनासाठी २६ मेची तारीख दिली होती. त्यानंतर काहीच दिवसांत गोवा व कोकण किनारपट्टी व्यापल्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाली होता. पण त्यानंतर मान्सूनचा प्रवास अर्ध्यातच रखडला. आता आगमनासाठी १५ जूनची तारीख दिली आहे.

**मान्सून कशामुळे रखडला?**

मुंबई-पुण्यात मान्सूनचं आगमन लांबलं आहे. वेस्टर्न डिस्टर्बन्स आणि वायव्येकडील हवेच्या अस्थिरतेमुळे मान्सूनच्या नेहमीच्या प्रवाहात व्यत्यय निर्माण झाला असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. येत्या २-३ दिवसांमध्ये अरबी समुद्राच्या आणखी काही भागांत, महाराष्ट्र, उर्वरित कर्नाटकात, तेलंगण, आंध्र प्रदेश आणि पश्चिम बंगालच्या उर्वरित भागांत मान्सूनची प्रगती होऊ शकते. तसेच, ओडिशा,



झारखंड आणि बिहारच्या आणखी काही भागांसह छत्तीसगढमध्ये नैऋत्य मोसमी पाऊस दाखल होऊ शकतो. महाराष्ट्रात मान्सून सोलापूरमध्ये दाखल झाला असल्यामुळे मुंबईआगमनही जवळच असेल असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. पण मान्सूनच्या आगमनापूर्वीच महाराष्ट्रात येत्या आठवड्यात पावसाचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. राज्यात कोकण, मुंबई, ठाणे, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात १२ ते १८ जून रोजी पाऊस होण्याची शक्यता आहे.

**मराठवाड्यात उष्णतेच्या लाटेची शक्यता**

एकीकडे नागरिक पावसाची प्रतीक्षा करत असताना मराठवाड्याला हवामान खात्याने उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. काही जिल्ह्यांमध्ये पावसासाठी पोषक वातावरण निर्माण झालं असलं तरी उष्मा कायम आहे. हवामान विभागाने बीड, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांमध्ये पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. पण १३ जून रोजी, बहुतांश भागांत उन्हाचा तडाखा वाढणार आहे.

**विदर्भातही उष्णतेच्या लाटेचा इशारा**

विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये १३ जून ते १६ जूनदरम्यान उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. काही जिल्ह्यांमध्ये हलका पाऊस होत असला तरी उन्हाचा चटका बसणार आहे. अमरावती, वाशिम, अकोला आणि यवतमाळ जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेसाठी अलर्ट देण्यात आला आहे. पण शनिवारी पहाटे अकोला जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे वातावरणात काहीसा गारवा निर्माण झाला.

**खानदेशात पावसाची शक्यता?**

खानदेशात दिवसभर उन्हाचा तडाखा कायम राहण्याची शक्यता आहे. कमाल तापमान ४० ते ४२ अंश सेल्सिअसवर जाण्याची शक्यता आहे. तसेच किमान तापमान २७ अंश सेल्सिअस असेल. पावसाची फक्त ५ ते १० टक्केच शक्यता आहे.

**पश्चिम महाराष्ट्रातील हवामान कसं असेल?**

पश्चिम महाराष्ट्रात सध्या मान्सूनचं आगमन लांबलं असल्यामुळे हवामान विभागाकडून कोणताही अधिकृत अलर्ट देण्यात आलेला नाही. पण काही जिल्ह्यांमध्ये पूर्वमोसमी पाऊस हजेरी लाऊ शकतो. पुणे, कोल्हापूर, साताऱ्यात आज मान्सूनपूर्व सरींची शक्यता आहे.

# राज्यभरात लालपरीचे चाकं थांबणार...

## एसटी कामगार समितीने उपसले आंदोलनाचे हत्यार...

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१३, मुंबई :** महाराष्ट्र एसटी कामगार संयुक्त कृती समितीने आता पुन्हा एकदा आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. समितीने येत्या २९ जुन पासून राज्यभरात बेमुदत धरणे आणि चक्का जाम आंदोलनाचा इशारा दिला आहे. त्यामुळे ऐन पावसाळ्यामध्ये लालपरीच्या प्रवासावर परिणाम होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. मुंबई सेंट्रल येथील वाहतूक भवनमध्ये एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. कामगार संघटनांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. विविध कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींनी आर्थिक व प्रशासकीय मागण्यांचा पाढा वाचला. त्यावेळी महागाई भत्ता ५३वरून ५८ टक्के करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच, भविष्यात राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ झाल्यास, एसटी कर्मचाऱ्यांनाही तशी वाढ तत्काळ लागू करण्याचे आदेशही सरनाईक यांनी प्रशासनाला दिले.

दरम्यान या सभेत एसटी कर्मचाऱ्यांना राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे अर्थात ५८ टक्के महागाई भत्ता देण्याची घोषणा परिवहनमंत्री आणि राज्य परिवहन (एसटी) महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी गुरुवारी केली. मात्र, वेतनवाढीची थकबाकी, सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी व अन्य मागण्या निकाली न निघाल्याने एसटी कामगार संयुक्त कृती समितीने २९ जूनपासून राज्यव्यापी ‘चक्का जाम’ आंदोलनाचा इशारा दिला आहे.

**दरम्यान समितीने केलेल्या एसटी कामगारांच्या प्रलंबित मागण्या पुढील प्रमाणे आहेत.**

- एसटी कर्मचाऱ्यांना राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन द्यावे.
- २०१६-२०२० या वेतनकराराच्या पॅकेजदरम्यान १ टक्क्यांनी कमी करण्यात आलेला वार्षिक वेतनवाढीचा दर २०१६ पासून मान्य केल्याप्रमाणे पुन्हा ३ टक्के करण्यात यावा.
- औद्योगिक न्यायालयाच्या निर्ण्यानुसार २०१८ पासूनची महागाई भत्त्याची थकबाकी तातडीने अदा करावी.
-राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे ५८ टक्के महागाई भत्ता लागू करावा



- एसटी महामंडळासाठी शासनाने स्वतंत्र बजेट तरतूद करावी.
- मध्यवर्ती कार्यशाळांना नवीन बसबांधणीसाठी चॅसिस उपलब्ध करून स्वमालकीच्या बसेस तयार कराव्यात.
- कामगार विरोधी चारही कामगार कायदे रद्द करावेत
- एसटी कर्मचाऱ्यांना कॅशलेस मेडिक्लेम सुविधा लागू करावी
- कंत्राटी भरती बंद करावी.
- महामंडळाच्या जागा झझझ खासगीकरणाऐवजी महामंडळानेच विकसित कराव्यात.
- भाडेतत्त्वावरील ई-बसेसऐवजी स्वमालकीच्या ई-बसेस घ्याव्यात.
- उन्नत प्रवर्गातील क. अधीका-यांना वर्ग २ कनिष्ठ अधिकाऱ्यांप्रमाणे न्याय्य वेतन लागू करावे.

समितीने हे आंदोलन तीन टप्प्यात होणार असल्याचे जाहीर केले आहे.

- दि.१५ जून २०२६ - राज्यातील सर्व आगार, विभागीय कार्यालयं, कार्यशाळा आणि मध्यवर्ती कार्यालय येथे घंटानाद व महाआरती आंदोलन करून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात येणार.
- दि.२२ जून २०२६ रोजी - महाराष्ट्रातील प्रत्येक युनिटसमोर प्रचंड द्वार सभा आयोजित करण्यात येणार.
- दि.२९ जून २०२६ पासून - मुंबईसह राज्यभरातील सर्व विभागीय कार्यालयं, मध्यवर्ती कार्यशाळा व मध्यवर्ती कार्यालयावर बेमुदत धरणे आंदोलन होणार आहे.

# विशेष मोहीमेत १५८ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त व १ लक्ष ५५ हजार दंड

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१३, नवी मुंबई :** जागतिक पर्यावरण दिनापासून सातत्याने पर्यावरण विषयक जाणीवजागृती करणारे उपक्रम राबविण्यासोबतच वृक्षारोपण, सखोल स्वच्छता मोहीमा, घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने माहिती प्रचार अशा विविध मोहीमा राबविल्या जात आहेत. ५ ते १२ जून या कालावधीत असे कार्यक्रम सातत्यपूर्ण राबविण्यात आले.

अशाच प्रकारचा पर्यावरणाला हानिकारक असणाऱ्या प्लास्टिकविषयी जनजागृती करण्याच्या उपक्रमासोबतच एकल वापर प्लास्टिकला प्रतिबंध करण्यासाठी तपासणी मोहीमांचेही सर्वत्र आयोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने १२ जूनला आठही विभाग कार्यालय क्षेत्रात विशेष प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीम राबविण्यात आली.

या विशेष मोहीमेमध्ये प्लास्टिक पिशव्या आणि एकल वापर प्लास्टिकचा उपयोग करताना आढळलेल्या ३० व्यावसायिक आणि आस्थापना यांच्यावर कारवाई करीत त्यांच्याकडून १ लक्ष ५५ हजार दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली तसेच साधारणत: १५८ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक साठा जप्त करण्यात आला.



यामध्ये बेलापूर विभागातून ३० हजार दंडात्मक रक्कम आणि १० किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त करण्यात आले तसेच नेरूळ विभागातून १० हजार दंडात्मक रक्कम व ५ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिकची जप्ती करण्यात आली. वाशी विभागातून ५ हजार दंडात्मक रक्कम व ५ किलो प्लास्टिक साठा आणि तुर्भे विभागात ८ व्यावसायिक / आस्थापना यांचेकडून ४५ हजार दंडात्मक रक्कम तसेच तब्बल १०० किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त करण्यात आले.

अशाच प्रकारे कोपरखैरणे विभागातून २० हजार दंडात्मक वसूली आणि २ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त तसेच घणसोली विभागातून ३० हजार दंडात्मक वसूली आणि २८ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त करण्यात आले. ऐरोली विभागातूनही १५ हजार दंडात्मक रक्कम वसूली आणि ८ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आलेले आहे.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे तसेच परिमंडळ १ उपआयुक्त सोमनाथ पोटरे आणि परिमंडळ २ उपआयुक्त संजय शिंदे यांच्या माध्यमातून सर्व विभाग अधिकारी तथा सहा.आयुक्त यांनी आपल्या कर्मचारी पथकांद्वारे ही प्लास्टिक प्रतिबंधात्मक धडक मोहीम राबविली.

प्लास्टिक हे हजारो वर्षे नष्ट होत नसल्याने पर्यावरणाला व मानवी जीवनाला हानीकारक असणाऱ्या प्लास्टिकचा वापर टाळणे हे अत्यंत महत्वाचे असून नागरिकांनी प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळून कापडी पिशव्यांचा वापर सुरू करावा व प्रतिबंधात्मक एकल वापर प्लास्टिकला आपल्या जीवनातून हद्दपार करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

# पुरातत्त्व विभाग करणार विठुरायाच्या मूर्तीचे संवर्धन : २ दिवस दर्शन बंद

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१३, पंढरपूर :** श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेच्या मूर्तींचे संवर्धन पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनानुसार दि.२२ ते २४ जून दरम्यान केले जाणार आहे. यामुळे २३ व २४ जून रोजी श्री विठ्ठल मंदिर दर्शनासाठी पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे.

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या तज्ज्ञांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये मूर्तीची पाहणी केली होती. विठ्ठल मूर्तीच्या पायाला खड्डा पडला असून इतर ठिकाणीही मोठ्या प्रमाणात झीज झाल्याचे निदर्शनास आले आहे. यापूर्वी १९८८, २००५, २०१२ व २०२० मध्ये मूर्तींचे संवर्धन करण्यात



आले होते. मागील संवर्धनाला ५ वर्षे पूर्ण झाल्याने पुन्हा झीज दिसून येत आहे.

यावेळी मूर्तीच्या दगडासारखीच पावडर ऑरगॅनिक रसायनात मिसळून झिजलेल्या भागावर लावली जाणार आहे. याला ‘वज्रलेप’ प्रक्रिया म्हणतात. पुरातत्त्व विभागाच्या नियमानुसारच हे रासायनिक लेपन केले जाणार आहे. सध्या दोन्ही मूर्ती पूर्णतः सुरक्षित स्थितीत आहेत. मात्र भविष्यात झीज होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना शासनाच्या मंजुरीनंतर पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली राबवल्या जातील, अशी माहिती मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. भाविकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही समितीने केले आहे.

# १५ वर्षांचा न्यायालयीन वाद मिटला; विठ्ठलवाडी येथील शेतरस्त्याचा मार्ग अखेर मोकळा

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१३, विंचूर (नाशिक) :** विठ्ठलवाडी (विंचूर, ता. निफाड) येथील विठ्ठलवाडी ते म्हसकर वस्ती या शेतरस्त्याचा तब्बल १५ वर्षांपासून रखडलेला प्रश्न अखेर सामंजस्याने आणि माणुसकीच्या भावनेतून मार्गी लागला आहे.

न्यायालयीन वाद संपुष्टात आल्याने या रस्त्यावर दगड-मुरूम टाकण्याचे काम सुरू झाले असून, यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

वाजिब-उल-अर्ज रेकॉर्डप्रमाणे अस्तित्वात असलेल्या या रस्त्यावर मालपाणी यांचे गट नंबर ८, ९, १०, ११, १२ मधील शेतकऱ्यांमध्ये गेल्या १५ वर्षांपासून न्यायालयीन वाद सुरू होता. या वादामुळे रस्त्याचे काम पूर्णपणे रखडले होते आणि पावसाळ्यात तसेच दैनंदिन वाहतुकीसाठी शेकडो शेतकऱ्यांना मोठा मनस्ताप व त्रास सहन करावा लागत होता.

**बैठका आणि संवाद ठरले फायदेशीर**

हा प्रश्न सोडवण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेत रस्ते चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, निफाड कृती समितीचे सदस्य विजय दरेकर यांनी पुढाकार घेतला. त्यांनी संबंधित दोन्ही बाजूंच्या शेतकरी बांधवांशी सातत्याने बैठका घेतल्या आणि संवाद साधला. न्यायालयीन प्रक्रियेत होणारा वेळ व पैशाचा अपव्यय आणि सामंजस्यातून होणारा सर्वांचा फायदा पटवून दिल्यानंतर या प्रयत्नांना मोठे यश आले.

**दावा मागे घेत सुरू झाले काम**

चळवळीच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत अनिल मालपाणी व रमेश सिताराम म्हसकर (गट नं. २१) यांनी मोठा भाऊ भाऊराव मोठेपणा दाखवत चालू असलेला न्यायालयीन दावा मागे घेण्यास सहमती दर्शवली. दोन्ही कुटुंबांनी परस्पर सामंजस्याने रस्त्याचे मार्किंग करून दिले असून, कालपासून या रस्त्यावर दगड-मुरूम टाकण्याचे काम युद्धपातळीवर सुरू झाले आहे. लवकरच हा रस्ता पूर्णपणे विकसित केला जाणार आहे.

**निफाड तालुक्यासाठी प्रेरणादायी आदर्श**

मालपाणी आणि म्हसकर परिवाराने दाखविलेला हा माणुसकीचा आणि सहकार्याचा आदर्श निफाड तालुक्यातील इतर गावांमधील वाद मिटवण्यासाठी अत्यंत प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त होत आहे. खाजगी जागेवरील रस्ता केवळ मनाचा मोठेपणा दाखवून खुला करून दिल्याबद्दल संबंधित शेतकरी बांधवांचे दादासाहेब जंगले पाटील व शेत रस्ते चळवळ कृती समिती, निफाड यांच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदन आणि आभार मानण्यात आले आहेत.




## पुढाकार कोण घेणार?

राज्यातील विविध रेल्वे विभागांत मागील अडीच-तीन महिन्यांत विनातिकिट प्रवास करणाऱ्यांविरोधात धडक मोहीम राबवली गेली. मुंबईत मध्य रेल्वेच्या मोहिमेत दोन महिन्यात ३० कोटी, पश्चिम रेल्वेने ५० कोटींची दंडवसुली केली. याच काळात दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागांतर्गत मे महिन्यात पावणेदोन कोटी रुपयांची वसुली झाली. नांदेड विभागाच्या इतिहासात इतकी मोठी वसुली प्रथमच झाली असावी. अचानक तिकीट तपासणी, ग्रामीण भागातील स्थानकापर्यंत विशेष बसने पोचणे, धावत्या रेल्वेत प्रवासी म्हणून एखाद्या स्थानकावरून जाणे अशा अनेक क्लृप्त्या अधिकाऱ्यांनी केल्या. विनातिकिट प्रवाशांना आळा घालणे आवश्यकच. अशी कारवाई गरजेचीच. मात्र ती करताना प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या सुविधांचाही विचार व्हायला हवा.

तपासणी मोहिमेत विनातिकीट प्रवासी सापडला तर, गडबडीत रेल्वेत बसलो तिकिट काढायला वेळ मिळाला नाही तिकीट काऊंटरवर मोठी रांग होती यांसह अनेक कारणे पुढे केली जातात. विनातिकीट प्रवास करणे चूकच. प्रवासाचे काही तास आधी ठरले तरी तिकीट घेण्यासाठी वेळ मिळत नाही, हे कारण अजिबात पटण्याजोगे नाही. ठरावीक स्थानकात उतरायचे असेल तर ते स्थानक येईपर्यंत तिकीट तपासण्यास कुणी येत नाही, अशा धारणेतून काही जण विनातिकीट प्रवास करतात. मग अशा प्रवृत्ती फोफावल्या की त्याचे अनुकरण सुरू होते आणि रेल्वेला आर्थिक फटका बसतो.

गेल्या काही वर्षांचा आढावा घेतल्यास असे लक्षात येईल, की काही ठिकाणच्या रेल्वेप्रवाशांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. एकट्या नांदेड विभागाचा आकडा एक कोटीपेक्षा अधिक आहे. या विभागात मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी ही म हत्त्वाची स्थानके येतात. वाढती प्रवासीसंख्या लक्षात घेऊन प्रशासनाने अनारक्षित प्रवाशांना तिकीट उपलब्ध व्हावे, यासाठी प्रत्येक स्थानकात एव्हीटीएम मशीन बसविले आहे. ॲपच्या माध्यम ातून रेल्वे स्थानकात पोचण्याच्या पाच किलोमीटर पूर्वीपर्यंत तिकीट काढण्याची सोय आहे. असे असतानाही विनातिकिट प्रवाशांची संख्या वाढणे चिंताजनक आहे.

पूर्वी रेल्वेगाड्यांची संख्या कमी असताना जागोजागी तिकीट तपासणी निरीक्षक उभे राहायचे. आता गाड्यांची संख्या वाढली; पण तिकीट तपासणी निरीक्षकांची संख्या मात्र वाढलेली नाही. दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात ३०० च्या आसपास निरीक्षक असल्याचे सांगण्यात येते. हा आकडा तोकडा असल्याने त्याचा गैरफायदा घेत विनातिकीट प्रवास करणाऱ्यांचे प्रमाण वाढले, हे एक कारण मानले जाते. उपलब्ध मनुष्यबळातून तिकीट तपासणी करताना वातानुकूलित व शयनयान डब्यातील प्रवाशांचे तिकीट तपासले जाते. जिथे तपासणी क्रू बदलतो तिथे निरीक्षक बदलून येतात आणि पुढची तपासणी सुरू होते. त्यात माहितीच्या देवघेवीत काही त्रुटी राहिल्यास तपासणीतही गफलती राहतात.

हे सारे प्रकार थांबवण्यासाठी व्यापक उपाययोजनांची गरज आहे. तिकीट तपासणी निरीक्षकांची संख्या वाढवणे, सर्व रेल्वेस्थानकांतत तिकिटासाठी आणखी काही सुविधा वाढवण्याची चाचपणी करणे, ऑनलाइन तिकीट उपलब्ध करून देण्यासाठी ॲपमध्ये सुविधा वाढविणे आणि प्रवासादरम्यान स्थानक गेल्यानंतर ठरावीक कालावधीत तिकीट घेण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे अशा पर्यायांचा विचार करता येऊ शकेल. त्याचसोबत, सर्वांत महत्त्वाचे म्हणजे रेल्वेत सर्वसाधारण डबे (जनरल कोच) वाढविणे अत्यावश्यक आहे. पूर्वीच्या अनेक प्रवासी गाड्यांना कालौघात एक्स्प्रेस गाडीचे स्वरूप देण्यात आले. त्यामुळे साध्या गाड्यांवरील ताण वाढणे साहजिकच आहे. प्रवासी गर्दी नियंत्रित राहावी आणि विभागावी यासाठी मराठवाड्यात पॅसेंजर, डेमू यांसारख्या गाड्यांची संख्या वाढविणे गरजेचे आहे. असे केले तरच यंत्रणेवरील ताण कमी होईल; पण यासाठी कुणीतरी पुढाकार घ्यायला हवा.

**– मकरंद कुलकर्णी**

# कार्यकाळ कोणाचा मोठा यापेक्षा कर्तृत्त्व महत्वाचे..?




भारतीय राजकीय इतिहासात दीर्घकाळ देशाचे नेतृत्व करणारे आणि जनमानसावर स्वतःचा अमिट प्रभाव पाडणारे नेते कमी नाहीत. आधुनिक भारताच्या इतिहासात पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यानंतर नरेंद्र मोदी हे असे नेते ठरले आहेत, ज्यांनी लागोपाठ तीनवेळा सार्वत्रिक निवडणुका जिंकून देशाचे नेतृत्व केले आहे. नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधानपदाची १२ वर्षे पूर्ण होत असताना, त्यांची तुलना भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कार्यकाळाशी केली जात आहे. पंडित नेहरू यांनी तीन निवडणुकांमध्ये विजय मि ळवला होता, तर १९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांनी अंतरिम पंतप्रधानपद सांभाळलेले होते. तीन सार्वत्रिक निवडणुकांचा विजय आणि पहिल्या निवडणुकीपूर्वी अंतरिम पंतप्रधान असे १७वर्षे ते देशाचे पंतप्रधान राहिले. त्यातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या कार्यकाळाची बरोबरी नरेंद्र मोदींनी केली आहे. कार्यकाळाची बरोबरी केल्यामुळे दोन नेत्यांची तुलना होऊ शकत नाही. कारण दोन्ही नेत्यांचा काळ, विचारसरणी आणि आव्हाने पूर्णपणे वेगळी होती. पंडित नेहरूंनी भारताच्या जडणघडणीत आणि जागतिक प्रतिमेत आपले अढळ स्थान निर्माण केले आहे. जवाहरलाल नेहरू यांचा वैचारिक पाया समाजवादी होता. ते राजकीय तत्वज्ञानपंडित होते. पंडित नेहरूंचा दृष्टिकोन 'लोकशाही समाजवाद' धर्मनिरपेक्षता आणि अलिप्ततावाद यावर आधारित होता.

फाळणीच्या दुःखातून बाहेर पडणाऱ्या देशाला एकत्र बांधून ठेवणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे हे त्यांचे मुख्य ध्येय होते. मोदींचे नेतृत्व सांस्कृतिक राष्ट्रवाद, मजबूत अंतर्भाव उदाहरणार्थ सबका साथ, सबका विकास अशा घोषणा आणि उजव्या विचारसरणीवर आधारित आहे. नेहरूंच्या 'समाजवादा'च्या जागी मोदींनी 'कल्याणकारी भांडवलशाही' आणि थेट लाभ हस्तांतरण यावर भर दिला. आर्थिक धोरणे आणि पायाभूत सुविधांचा अभाव असलेल्या काळात नेहरूंनी पंतप्रधानपद सांभाळले. स्वातंत्र्यानंतर देशात सुई-टाचणीही तयार होत नव्हती. अशा वेळी नेहरूंनी आयआयटी, आयआयएम, इस्रोची पार्श्वभूमी तयार केली होती, आणि भाक्रा नांगलसारखी मोठी धरणे उभारली. यातून देशाच्या हरितक्रांतीचा पाया रचला गेला. त्यांनी या प्रकल्पांना आधुनिक भारताची मंदिरे म्हटले. मोदींच्या १२ वर्षांच्या काळात अशी कोणती मंदिरे उभी करण्यात आली. पंडित नेहरूंचा भर उद्योग उभारणे आणि उद्योग सरकारी नियंत्रणाखाली आणणे होता. मोदींच्या १२ वर्षांच्या कार्यकाळात भारत सरकारच्या निर्गुंतवणूक आणि खासगीकरण धोरणात मोठा बदल करण्यात आला. या काळात सरकारने धोरणात्मक निर्गुंतवणुकीवर भर दिला, ज्याचा अर्थ केवळ शेअर्स विकणे नाही, तर कंपनीचे व्यवस्थापन आणि मालकी पूर्णपणे खासगी हातात सोपवण्यात आली. भारताने रस्ते, महामार्ग, विमानतळ आणि वंदे भारतसारख्या आधुनिक रेल्वेचे जाळे विस्तारले. भारत जगातील ११ व्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेतून ५ वी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला. मात्र हा मान फार काळ ते टिकवू शकले नाहीत. आता भारताची पुन्हा घसरण झाली. डॉलरच्या तुनलेत रुपया शंभरी पार करताना याच काळात दिसणार अशी स्थिती आहे. परराष्ट्र धोरणात नेहरू काळात जगाचे लक्ष भारताकडे राहात होते. अलिप्ततावादी चळवळ आणि पंचशील तत्वे भारताने स्वीकारली होती. मोदींच्या काळात आता देशाने बहु-आघाडीय धोरण आणि राष्ट्रीय हित सर्वोपरी तत्व स्वीकारले. म ोदीं समर्थक आणि भाजप नेत्यांकडून मोदींच्या काळात देशाचा ग्लोबल आवाज आणि मजबूत आर्थिक शक्ती म्हणून उदय होत असल्याचा दावा करण्यात येतो. नेहरूंच्या काळात गरिबी निर्मूलनासाठी मोठ्या योजनांपेक्षा संस्थात्मक उभारणीवर भर देण्यात आला होता. प्रशासकीय कारभार मजबूत करण्यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. पंडित नेहरूंनी या देशाचा पाया रचला त्यावर त्यांच्या नंतर येणाऱ्या सर्वच पंतप्रधानांनी देशाला मजबूतपणे उभे करण्याचे काम केले आहे. यात लालबहादूर शास्त्री, इंदिरा गांधी, राजीव गांधी, नरसिंह राव, डॉ. मनमोहन सिंह या सर्व पंतप्रधानांनी आपापल्या काळात देशाला विकासाच्या वाटेवर आणि आर्थिक आघाडीवर नेत जागतिक राजकारणात वेगळी छाप निम र्ाण केली. राजीव गांधी यांनी नवतंत्रज्ञानावर त्यांच्या काळात भर दिला, त्यामुळेच आज आपण डिजिटल इंडिया म्हणून मिरवत आहोत.

नरसिंह राव पंतप्रधान आणि डॉ. मनम ोहन सिंग अर्थमंत्री असतानाच्या काळात देशाने आर्थिक उदारीकरणाचा निर्णय घेऊन जागतिक स्पर्धेत देशाला पोहचवले. १९९० च्या दशकात भारताच्या खालावलेल्या आर्थिक स्थितीवर या जोडगोळीने मात केली. भविष्यातील महासत्तेचा पायाही रचला. लोकशाही संस्था आणि नेतृत्व शैली संसदीय लोकशाहीचा विचार केला तर पंडित नेहरू हे संसदेतील चर्चेला आणि विरोधकांच्या मताला प्रचंड मान देत असत. त्यांच्या काळात संस्थांना स्वायत्तता दिली गेली. तर मोदींचे नेतृत्व हे अधिक केंद्रीभूत मानले जाते, जिथे निर्णय घेण्याची गती एका व्यक्तीकडे केंद्रित झालेली. मोदींच्या १२ वर्षांत अनेक धाडसी आणि ऐतिहासिक निर्णय घेतले गेले, जसे की कलम ३७० रद्द करणे, राम मंदिर निर्माण, जीएसटी लागू करणे. नेहरूंच्या काळात राज्यांची पुनर्रचना आणि हिंदू कोड बिल हे ऐतिहासिक निर्णय होते.

मोदींच्या कार्यकाळात बेरोजगारी, वाढती महागाई आणि सामाजिक ध्रुवीकरण या मुद्द्यांवर विरोधकांकडून सातत्याने टीका केली जाते. पंडित नेहरू हे आधुनिक भारताचे 'शिल्पकार' होते, ज्यांनी लोकशाहीचा पाया रचला आणि देशाला संस्थात्मक रूप दिले. टीकेलाही सकारात्मक घेतले. वय देशाचे, देशाच्या स्वातंत्र्याचे वाढतच जाणार आहे. या संपूर्ण काळात नवनवीन पंतप्रधान येत राहतील, कोण किती काळ सत्तेत होतं याची आकडेम ोड करण्यापेक्षा कोणाच्या काळात देशाचा, नागरिकांचा किती विकास झाला, याची इतिहास नोंद घेत असतो. कार्यकाळ कोणाचा मोठा यापेक्षा कर्तृत्त्व कसे राहिले याची नोंद इतिहास नक्कीच घेईल.

# रक्तदान सर्वश्रेष्ठ दान !

आज १४ जून, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक रक्तदान दिन म्हणून साजरा केला जातो. ऑस्ट्रेलियातील डॉ कार्ल लॅंडस्टेनर या संशोधकाच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस जागतिक रक्तदाता दिन म्हणून साजरा केला जातो. १४ जून हा त्यांचा जन्मदिन आहे. डॉ कार्ल लॅंडस्टेनर यांनी 'एबीओ' हा नवा रक्तगट शोधून काढला त्यांच्या या संशोधनासाठी त्यांना नोबेल पारितोषिक मिळाले होते.

पहिला जागतिक रक्तदाता दिन २००५ साली साजरा झाला होता. त्यानंतर दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. प्रत्येक वर्षी एक सूत्र घेऊन हा दिवस साजरा केला जातो. माता सुरक्षा, रक्तदान श्रेष्ठ दान, डोनेट प्लेटलेट्स यासारखे सूत्र घेऊन त्याची माहिती या दिवशी दिली जाते. रक्तदानाचे आवाहन केले जाते. जागतिक आरोग्य संघटनेने घोषित केलेल्या या दिवसाच्या साजरीकरणात रेड क्रॉस सोसायटीचा हिरीरीने भाग असतो. कौन्सिल ऑफ युरोप ही संघटना देखील रक्तदाना संदर्भात मोठ्या प्रमाणात जनजागृती करते. आपल्या देशात देखील विविध शासकीय, सामाजिक, सेवाभावी संस्था या दिवसाचे आयोजन करून लोकांमध्ये रक्तदाना संदर्भात जनजागृती करतात.

या दिवशी रक्तदात्यांच्या सन्मान केला जातो. रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. रक्तदान श्रेष्ठ दान असं म्हटलं जातं कारण या दानामुळे म ाणसाचा जीव वाचतो. सुरक्षित रक्त ही अलीकडची वैश्विक समस्या निर्माण झाली आहे. दरवर्षी ९ कोटी युनिटपेक्षा अधिक रक्त दान केले जाते तरीही रक्ताचा तुटवडा जाणवतो. अपघातग्रस्त व्यक्ती, शस्त्रक्रिया झालेले व्यक्ती, रक्तातील त्रुटी असलेले व्याधीग्रस्त व्यक्ती, बाळंतपणात होणारे मातांचे मृत्यू आणि कुपोषण, विविध प्रकारचे बाळ मृत्यू, साथीचे आजार अशावेळी रक्ताची खूप गरज पडते. कोरोना काळात तर रक्ताचा कसा अभूतपूर्व तुटवडा जाणवला होता हे आपण पाहिलेच आहे. कोरोना काळात रक्तदान शिबिरे बंद असल्याने देशात रक्तदानाचा अभूतपूर्व असा तुटवडा जाणवला होता. रक्ताच्या तुटवड्यामुळे अनेक शस्त्रक्रिया पुढे ढकलाव्या लागल्या होत्या. पंतप्रधान आणि मुख्यमंत्री महोदयांनी नागरिकांना रक्तदान करावे असे आव्हान केले होते. भविष्यातही रक्ताचा असा तुटवडा निर्माण होऊ शकतो. आपल्या रक्तामुळे कोणाचा तरी जीव वाचतो. म्हणूनच रक्तदानाला सर्वश्रेष्ठ दान असे म्हणतात. रक्तदानाच्या रूपाने आपण मानवतेला एक मोठी देणगी बहाल करतो. रक्तदान केल्याने कोणतीही इजा किंवा दुष्परिणाम होत नाही. मनुष्याच्या शरीरात ५ लिटर रक्त असते आणि रक्तदानात केवळ ३५० मिली इतकेच रक्त घेतले जाते त्यामुळे कोणतीही कमजोरी जाणवत नाही. विशेष म्हणजे २४ ते ४८ तासात जेवढे रक्त आपण दान दिले आहे तेवढे पूर्ववत होते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने पुढे येऊन रक्तदान केले पाहिजे. रक्तदान सर्वश्रेष्ठ दान असे म्हणून प्रचार होत असला तरी आपल्याकडे रक्तदात्यांची संख्या खुपच कमी आहे. भारतात फक्त ०.६ टक्केच लोक रक्तदान करीत असतात. १३० कोटी लोकसंख्येच्या देशात हे प्रमाण खूप कमी आहे त्यामुळे देशात रक्ताची खूप कमतरता भासते त्यात कोरोना सारख्या महामारीत तर अभूतपूर्व परिस्थिती निर्माण होते. अपघातातील रुग्ण, प्रसव काळ, अतिदक्षता विभाग, तातडीच्या शस्त्रक्रिया अशा वेळी रक्ताची गरज निर्माण होते जर रुग्णांना वेळीच रक्त मिळाले नाही तर त्यांचा मृत्यूही होऊ शकतो त्यामुळे प्रत्येकाने सजग राहायला हवे. आपल्या रक्तामुळे कुणाचा तरी प्राण वाचणार आहे. रक्तदान म्हणजे जीवनदान, रक्तदान सर्वश्रेष्ठ दान हे लक्षात घेऊन प्रत्येकाने रक्तदान करायला हवे.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२२५४६२९५**

## छापा

चाले धडक कारवाई
अवैध वस्तूंवर छापा
कळू द्यावे सगळ्यांस
बातम्या ठळक छापा

राजरोस चालवलेल्या
द्या कडक शिक्षापापा
येऊद्या फोन कुठूनही
फिकीर न कुणा बापा

जड असू द्या कितीही
ना स्विकारु लिफाफा
कायजाते उधळायला
हपापाचा माल गपापा

घोरत होते पहारेकरी
पुष्कळ झाल्या झोपा
रे डोळेझाक करायचा
मार्ग असे सरळ सोपा

शरण कायद्या सामोरे
ते येतील टाकत धापा
मूळमुद्दा बाजूस ठेवून
मारतीलं अवांतरगप्पा

मैदानआहे रे विस्तीर्ण
आरंभला पहिलाटप्पा
हादरवेत दलाल उमत्त
ऐकता धाडीच्या टापा

**– हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# समर स्पेशल मँगो एनर्जी ड्रिंक : मँगो कस्टर्ड समर स्पेशल

सध्या आंब्याचा मौसम जोरात सुरु आहे. आतापर्यंत सगळ्यांचे या फळाच्या राजाचे असंख्य पदार्थ बनवून, खाऊन झाले असतीलच! आज आपण एकदम यम्मी, पाहूनच खाण्याचा मोह आवरणारच नाही असा आणि हेल्दी असा सुरेख पदार्थ बनवूया. हा फक्त एक ग्लास किंवा बाऊल भर पोटात गेला तर दिवसभर भूक लागणे शक्यच नाही. शिवाय महत्वाचे म्हणजे यात जर कस्टर्ड ऐवजी साबुदाण्याचे पीठ वापरले तर हा उपवासासाठी सुद्धा खूप छान पर्याय आहे. खिचडी, भगर, बटाट्याचे असंख्य तेलकट, तुपातील, तळकट पदार्थ खाऊन उन्हाळ्यात पित्ताचा हमखास त्रास होतो. ते जास्त खाल्लेही जात नाहीत, उलट दिवसभर नुसते पाणी पिऊन पोटाला तडस लागते. याउलट उन्हाळ्यात थोडेसे पातळ, थंडगार, गोड पदार्थ खाल्ले तर आरोग्यासाठी उत्तम असते. आणि या पदार्थाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे यात साखरेचा किंवा गुळाचा आजिबात वापर केला नाही, त्यामुळे डाएटसाठीही बेस्ट आहे. मग तर लगेंच लागा तयारीला...

**साहित्य :**

१ लिटर दूध.. शक्यतो फुलक्रीम असेल तर उत्तम!, दीड चमचा व्हनीला कस्टर्ड पावडर, दोन चमचे मध, १ वाटी फ्रेश क्रीम, अर्धा चमचा सब्जाचे बी, पाव वाटी भिजवलेला साबुदाणा, दोन पिकलेले हापूस आंबे, सजावटीसाठी थोड्या गुलाब पाकळ्या, पाव वाटी डाळिंब दाणे, एका आंब्याच्या फोडी वरून घालण्यासाठी.

**कृती :**



सर्वांत आधी सब्जाचे बी भरपूर पाण्यात भिजत ठेवावे.त्यानंतर पाऊण लिटर दूध गरम करण्यासाठी ठेवावे. थोड्या दुधात कस्टर्ड पावडर मिक्स करावी. दुधाला उकळी येताच हे कस्टर्ड मिक्स केलेले दुध सावकाशपणे एकसारखे ढवळत त्यात घालावे, म्हणजे गाठी होणार नाहीत. आता दुधाला लगेंच दाटपणा येईल. मग हे गॅस वरून खाली काढून थंड होण्यासाठी ठेवावे. तो पर्यंत दुसरीकडे गॅसवर एका कढईत दीड.. दोन ग्लास पाणी घालून त्यात रिंग ठेवून ते गरम करण्यास ठेवावे. एका डब्यात किंवा पसरट भांड्यात साबुदाणा पसरून ठेवावा. त्यावर झाकण ठेवून ७..१० मिनिटे मध्यम आचेवर वाफवावा. त्याचा पांढरा रंग पूर्णपणे जाऊन चमकदार झाला की तो व्यवस्थित शिजला असे समजते. मग तो बाहेर काढून त्यात लगेंच भरपूर थंडगार पाणी घालावे म्हणजे हा साबुदाणा एकदम सुटा सुटा होतो आणि चिकटत नाही. यातील पाणी गाळण्यातून काढून टाकून तो बाऊल मध्ये काढून ठेवावा. सब्जाचे बी पण आता छान भिजले असेल आणि मस्त फुगले असेल. दुध व्यवस्थित थंड झाले असेल.

आता २ आंब्यांचा रस काढून तो मिक्सरमधून उरलेले थोडे दूध घालून फिरवून घ्यावा. फिरवतानांच त्यात फ्रेश क्रीम घालावे म्हणजे मस्त क्रिमी टेक्सचर येते. आणि टेस्ट सुद्धा एकदम सुरेख येते.

आता हे कस्टर्ड मध्ये मिक्स करावे. त्यात सब्जा बी, डालिंबदाणे, मध घालून मस्त फेटावे. मग भिजवलेला.. शिजवलेला साबुदाणा त्यात घालून हलकेच ढवळून मिक्स करून घ्यावे.

शेवटी सर्व्हिंग ग्लास किंवा बाऊलमध्ये घालून वरून सजावटी साठी गुलाबाच्या सुगंधी पाकळ्या घालाव्यात. ड्रायफ्रुट्सचे पातळ काप घातले तर मग आणखीनच आकर्षक तर दिसेलच आणि हेल्दी, रिच पण दिसेल.

**वैशिष्ट्य :**

आंब्याच्या सोबत व्हनिला फ्लेवर म्हणजे सुरेख कॉम्बीनेशन आहे. अगदी आईस्क्रिमखाण्याचा भास होतो. साखर किंवा गुळाच्या ऐवजी मध घातल्याम ुळे टेस्ट आणि चमक दोन्ही मस्त येते शिवाय मध त्यांच्याहून कित्तीतरी लाभदायक आहे. साबुदाण्याम ुळे पोट भरते. एरव्ही कस्टर्ड चालते, बेस्ट लागते. पण हे उपवासाला बनवताना त्या ऐवजी फक्त १ चमचा साबुदाण्याचे पीठ दुधात मिक्स करून घालावे. त्यामुळेही असाच थिकनेस येतो. सब्जा, गुलाबपाकळ्या थंडावा देतात आंब्याचा स्वाद आणि आकर्षक रंग यामुळे हे आपल्याला नक्कीच मोहात पाडते.

**- सौ.स्नेहा मुसरीफ, पुणे.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## फर्दापूर बीट अंतर्गत अंगणवाडी बालकाची आरोग्य तपासणी व मोफत औषधी वाटप



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, फर्दापूर :** सोयगाव तालुक्यातील फर्दापूर येथील ग्राम पंचायत परिसरात असलेल्या अंगणवाडी मध्ये दि.१३ शनिवारी प्रकल्प कार्यालय व राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम पथक सावळदबारा यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.दिनाजी खंदारे यांच्या मार्गदर्शनाखाली फर्दापूर बीट अंतर्गत येणाऱ्या अंगणवाडी मधील बालकांची आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. फर्दापूर बीट अंतर्गत असलेल्या फर्दापूर, फर्दापूर तांडा, वरखेडी बुद्रुक, ठाणा येथील अंगणवाडी सेविका यांनी अंगणवाडी बालके व पालकांसह आरोग्य तपासणी शिबिरात सहभाग नोंदवला होता.

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम सावळदबारा पथक प्रमुख डॉ.रमेश चव्हाण, डॉ. शितल डोके,यांनी उपस्थित बालकांची आरोग्य तपासणी केली तर औषध निर्माता आकाश चवरे यांनी बालकांना औषधी दिली. यावेळी बालकांना सकस आहार द्या, त्यांच्या हालचालीकडे लक्ष ठेवा, कुपोषण मुक्ती साठी पालकांनी सुद्धा सहकार्य करणे गरजेचे असल्याचे डॉ.रमेश चव्हाण यांनी उपस्थित पालकांना सांगितले तर महिलांशी डॉ.शितल डोके यांनी संवाद साधला. दरम्यान कुपोषण कमी करण्यासाठी अखिल भारतीय केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन चे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांनी हा उपक्रम सुरू केला असून्य संजय शहापूरकर यांच्या माध्यमातून बालकांना मोफत औषधी वाटप करण्यात येते.

आरोग्य तपासणी शिबिर यशस्वितेसाठी फर्दापूर बीट च्या पर्यवेक्षिका रिता लांडगे यांनी परिश्रम घेतले.यावेळी अंगणवाडी सेविका हर्षा परदेशी, मुनिरा शेख,वर्षा खेडेकर, आशा पाटील,वर्षा काळे, सुनिता आगळे, इरफाना शेख, अलका जाधव, संकुतला पानपाटील, मुक्ता चव्हाण, द्रोपदा मगरे,मदतनीस आदींसह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बचतगट चळवळीला बळकटी देण्यासाठी बँक कटिबध्द : अध्यक्ष रविंद्र शिंदे



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने बचतगट चळवळीला प्रभावीपणे राबवून लोकचळवळीचे स्वरुप प्राप्त करुन दिले. महिलांनी बचतगटाच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबन साधून विकास साधावा बचतगट चळवळीला बळकटी देण्यासाठी बँक कटिबध्द असल्याचे बँकेचे अध्यक्ष रविंद्र शिंदे यांनी सांगितले.

१ एप्रिल २०२६ ते ३१ मे २०२६ या देन महिन्यात बँकेने ८७४ बचतगटांना रु. २६ कोटी ३ लाख रुपयांचे कर्ज वाटप केले. तसेच बँकेने आत्तापर्यंत एकूण २३९४६ बचतगटांची स्थापना केली असून सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात ७०७४ बचतगटांना रु. १८६ कोटी ७३ लाख रुपयांचे कर्ज वाटप केले आहे. ऑक्टोबर २०२५ अखेर बचतगटांच्या कर्जाची ९१ टक्के वसुली झाली असून, ही बाब बचतगटाच्या आर्थिक शिस्तीचे द्योतक असल्याचे सांगितले.

नाबार्डकडून सन २०२४-२५ या वर्षासाठी एन. आर. एल. एम. बचतगटासाठी रु १ कोटी २१ लाख ९८ हजार व्याज परतावा बँकेला प्राप्त झाला असून ही रक्कम संबंधित बचतगटाच्या खात्यात जिमा करण्यात येत आहे. बचतगट क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल, बँकेला नाबार्डकडून सलग ६ वेळा राज्यातून प्रथम पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. याशिवाय विविध संस्थांकडूनही बँकेचा वेळोवेळी गौरव करण्यात आला आहे. बचतगट कर्ज वाटप प्रक्रिया अधिक गतीमान व सुलभ करण्यासाठी कर्ज मंजूरीचे अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार बचतगट कर्जवाटप धोरणांतर्गत कर्ज वाटप अधिकार शाखाधिकारी रु ३ लाखापर्यंत, विभागीय अधिकारी रु ३ लाखाचे वर ते रु ४ लाखापर्यंतचे व रु ४ लाखाचे वर ते ७ लाखापर्यंत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी याना अधिकार देण्यात आले व रु ७ लाख ते रु १० लाखापर्यंतचे अधिकार व कार्योत्तर मान्यतेचे अधिकार बँकेच्या कर्जधोरणानुसार कर्ज समिती सभेला आहे. महिलांनी बचतगटाच्या माध्यमातून कर्ज घेऊन आपल्या गरजा भागवाव्या, शेतीपूरक व्यवसाय सुरु करावेत, लघू व गृहउद्योग उभारुन कुटुंबाच्या आर्थिक प्रगतीस हातभार लावावा व आपला विकास साधावा. बँक महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सदैव पाठीशी असल्याचे बँकेचे अध्यक्ष रविंद्र शिंदे यांनी स्पष्ट केले. बचतगटांना पारदर्शक सुलभ व तात्काळ पध्दतीने कर्ज उपलब्ध व्हावे या उद्देशाने बँकेमार्फत विशेष प्रयत्न करण्यात येत असून बँकेचे अध्यक्ष रविंद्र शिंदे, उपाध्यक्ष संजय डोंगरे, मानद सचिव अवेश खान पठाण तसेच बँकेचे समस्त संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली बचतगट कर्ज वाटपाची प्रक्रिया अधिक प्रभावीपणे राबविण्यात येत असून, महिलांनी वेळेवर कर्ज घेऊन मुदतीच्या आत कर्ज फेडण्याचे आवाहन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश्वर कल्याणकर यांनी केले.

## बोरी येथे सोयाबीन पीक प्रात्यक्षिक व बियाणे वाटप कार्यक्रम

**अक्षराज : जाफर शेख**

**दि.१२, बोरी (परभणी) :** बोरी येथील मल्हारी महिला बचत गट व कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सोयाबीन पीक प्रात्यक्षिक व मोफत बियाणे वाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला परिसरातील महिला शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.सोयाबीन हे आपल्या भागातील महत्त्वाचे नगदी पीक म्हणून ओळखले जाते. योग्य वाणांची निवड करून वेळेवर पेरणी करीत शास्त्रीय पद्धतीचा अवलंब केल्यास उत्पादनात नक्कीच वाढ होऊ शकते. त्यामुळे आजच्या काळात कमी खर्चात अधिक उत्पादन घेणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन प्रगतशील शेतकरी व कृषी तज्ज्ञ संतोष तायडे यांनी केले. या कार्यक्रमात महिलांना आधुनिक शेती पद्धती, सोयाबीन लागवडीचे महत्त्व व बियाण्यांचे योग्य व्यवस्थापन याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या शिवसेना महिला आघाडीच्या माजी जिल्हाध्यक्ष आशाताई गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्या म्हणाल्या की, महिलांच्या चिकाटीपणामुळे व व्यावहारिक दृष्टिकोनामुळे कुटुंबाचा आर्थिक व सामाजिक कायापालट होऊ शकतो. महिलांनी स्वतः बाजारपेठेत जाऊन सोयाबीनसह इतर पिकांच्या बाजारभावाची माहिती घेतली पाहिजे. तसेच शेती उत्पन्नाचे योग्य नियोजन करून आपले कुटुंब सुखी व समृद्ध करण्यासाठी पुढाकार घ्यावा.शेतीची धुरा महिलांच्या हाती दिल्यास उत्पादनात नक्कीच वाढ होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी मल्हारी महिला बचत गटाच्या अध्यक्षा सौ. प्रतिभा तायडे या होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून माजी जिल्हाध्यक्ष आशाताई गायकवाड, दिनकर चौधरी, संतोष तायडे आणि बचत गटाच्या सचिव शारदा तायडे प्रामुख्याने उपस्थित होत्या. या मान्यवरांच्या हस्ते उपस्थित महिला शेतकऱ्यांना सोयाबीन बियाण्यांचे मोफत वाटप करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक विष्णू तायडे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विश्वनाथ शिंपले, तुकाराम गोरे, उत्तम शिंपले, विकास काळे, शिवाजी चौधरी, विष्णू तायडे, तुकाराम सर्जे, वेदांत तायडे, गंगाधर शिंपले आदींनी मोलाचे परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या सर्व लाभार्थी महिलांना बियाणे वाटप करण्यात आले.

# १४ कोटींची जलयोजना कागदावरच? महिनाभरापासून मंद्रूपकरांची पाण्यासाठी फरफट!

### पाणीप्रश्नाकडे दुर्लक्ष करून पदाधिकाऱ्यांची ग्रामसेवक मागणीसाठी पंचायतसमिती वारी

**ग्रामसेवक मागणीवरून चर्चा**

स्थानिक ग्रामसेवक नागेश जोडमोटे यांची काही महिन्यांपूर्वी बदली झाली होती. दरम्यान, ग्रामसेवक कुशाबा इंगळे रजेवर गेल्यानंतर पुन्हा जोडमोटे यांची नियुक्ती करण्यासाठी काही पदाधिकाऱ्यांनी हालचाली सुरू केल्याची चर्चा आहे. पाणीटंचाईसारख्या गंभीर प्रश्नावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी ग्रामसेवकाच्या मागणीवर अधिक भर दिला जात असल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे.



**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.१३, दक्षिण सोलापूर :** तालुक्यातील मंद्रूप गावात गेल्या महिनाभरापासून पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने नागरिकांचे हाल सुरू आहेत. ऐन उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्यांना वणवण भटकावे लागत असताना ग्राम पंचायत प्रशासनाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. परिणामी गावात तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

विद्युत पंपातील बिघाड, जलवाहिनी फुटणे आणि भीमा नदीतील पाण्याची कमतरता ही कारणे प्रशासनाकडून पुढे केली जात असली, तरी नागरिकांच्या मते ही कारणे आता नित्याची झाली आहेत. प्रत्यक्षात नियोजनाचा अभाव आणि देखभालीकडे झालेल्या दुर्लक्षामुळेच परिस्थिती गंभीर बनल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

मंद्रूपसाठी तब्बल १४ कोटी रुपये खर्च करून नवीन पाणीपुरवठा योजना उभारण्यात आली. याशिवाय टाकळी येथील जुनी जलवाहिनीही उपलब्ध आहे. मात्र दोन-दोन योजना अस्तित्वात असतानाही गावाला नियमित पाणी मिळत नसल्याने कोट्यवधी रुपयांचा निधी नेमका कुठे खर्च झाला, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. योजना आहे, निधी आहे; पण पाणी कुठे आहे? अशी संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

दरम्यान, पाणीटंचाईच्या गंभीर प्रश्नावर प्रशासनाकडे पाठपुरावा करण्याऐवजी काही पदाधिकाऱ्यांचे लक्ष इतर प्रशासकीय विषयांकडे अधिक असल्याची चर्चा गावात रंगली आहे. नागरिक पाण्यासाठी त्रस्त असताना ग्रामसेवकाच्या मागणीसाठी पंचायत समिती कार्यालयात धावपळ सुरू असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

गावातील पाणीप्रश्नाला राजकीय रंग चढल्याचेही बोलले जात आहे. पाणीपुरवठा सुरळीत करण्याऐवजी आरोप-प्रत्यारोप आणि राजकीय कुरघोड्यांमध्ये वेळ वाया जात असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मात्र पाण्याच्या एका हंड्यासाठी भटकंती करावी लागत आहे.

विशेष म्हणजे सत्ताधारी आणि विरोधक या दोन्ही गटांविषयी नागरिकांमध्ये नाराजी आहे. सत्ताधारी पाणीप्रश्न सोडविण्यात अपयशी ठरत असताना विरोधकांकडूनही प्रभावी भूमिका घेतली जात नसल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीत तेरी भी चूप, मेरी भी चूप अशी स्थिती निर्माण झाल्याची चर्चा गावभर सुरू आहे.

सुमारे २५ हजारांहून अधिक लोकसंख्या असलेल्या मंद्रूपमध्ये महिनाभर पाणीपुरवठा सुरळीत न झाल्याने ग्रामपंचायत प्रशासनाचा कारभार पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत होत असून, तातडीने पाणीपुरवठा पूर्ववत न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे आता वरिष्ठ अधिकारी या प्रश्नात हस्तक्षेप करून मंद्रूपकरांची तहान भागविणार का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

**१४ कोटींची योजना फेल; प्रशासन जबाबदार**

मंद्रूपला नवीन पाणीपुरवठा योजना सुरू होऊन वर्ष पूर्ण झाले आहे. मात्र नियोजनशून्य कारभारामुळे ही योजना अपयशी ठरत आहे. ग्रामपंचायत प्रशासनाच्या अकार्यक्षमतेचा फटका नागरिकांना बसत असून, प्रशासनाने तातडीने लक्ष न दिल्यास जिल्हा परिषदेसमोर आंदोलन छेडले जाईल.

**– जावीद आवटे, तालुकाध्यक्ष, अखिल भारतीय किसान सभा, दक्षिण सोलापूर**

**पाण्यावरून राजकारण?**

पूर्वी टाकळीच्या जलवाहिनीवरून मंद्रूपला नियमित पाणीपुरवठा होत होता. आता नवीन १४ कोटींची योजना आणि जुनी योजना दोन्ही उपलब्ध असतानाही पाणीटंचाई कायम आहे. ग्रामपंचायतीने प्रस्ताव दिल्यास पंचायत समिती स्तरावर पाठपुरावा करण्यास आम्ही तयार आहोत.

**– मळसिद्ध मुगळे, पंचायत समिती सदस्य, मंद्रूप**

# आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शहापूरात भव्य रक्तदान शिबिर

**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.१३, शहापूर (ठाणे) :** हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त समाजोपयोगी उपक्रमांची परंपरा कायम राखत तसेच शिवसेना नेते व युवासेना प्रमुख मा. आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त युवा सेना शहापूर तालुक्याच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. युवासेना तालुका अधिकारी महेश दिनकर यांच्या नेतृत्वाखाली रक्तदान शिबिर सपन्न झाले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युवासेना सचिव गणेश मारुती चौधरी, अतिश वरकुटे, किरण खाडे, अतिश अधिकारी, तेजस निचिते, सुनिल घोडविंदे, रुपेश दराडे, अर्जुन सदगीर, अजित विशे, पीयूष अधिकारी यांच्या विशेष पुढाकार, नियोजन आणि अथक परिश्रमांमुळे हा सामाजिक उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख शंकरजी खाडे,जिल्हा सचिव काशिनाथजी तिवरे, जिल्हा महिला संघटिका रश्मीताई निमसे , तालुकाप्रमुख बाळा दादा धानके, युवासेना कोकण विभागीय सचिव अविनाश राऊत, युवासेना जिल्हाप्रमुख स्वानंद शेळवले, शिवसेना संपर्कप्रमुख, मिलिंद देशमुख, गणेश अवसरे, जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र विशे, जानू हिरवा, विजय देशमुख, अजित पोतदार, हेमंत मोरे, अरुण मडके, मधुकर वेखंडे, शरद मोगरे, प्रकाश फर्डे, विकास डोंगरे, रविंद्र खाडे, रमेश विशे, काजल दिनकर आणि भास्कर भोईर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



रक्तदान हेच श्रेष्ठ दान या संदेशाला प्रतिसाद देत मोठ्या संख्येने रक्तदात्यांनी शिबिरात सहभाग घेतला. या उपक्रमामुळे गरजू रुग्णांसाठी जीवनदायी रक्तसाठा उपलब्ध होण्यास मोलाची मदत होणार आहे.

विशेष म्हणजे, पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत प्रत्येक रक्तदाता तसेच उपस्थित सर्व मान्यवर आणि पाहुण्यांना तुळशीचे रोपटे भेट स्वरूपात प्रदान करण्यात आले. रक्तदानासोबतच वृक्षसंवर्धन आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्याचा हा उपक्रम उपस्थितांच्या विशेष पसंतीस उतरला.

युवा सेना शहापूर तालुक्याच्या या उपक्रमातून बाळासाहेब ठाकरे यांनी दिलेल्या समाजसेवेच्या विचारांना आणि मा. आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली राबविल्या जाणाऱ्या जनहिताच्या कार्याला पुन्हा एकदा उजाळा मिळाला.

# उपजिल्हा रुग्णालय गंगापूर येथे डॉक्टर आणि परिचारिकेच्या हलगर्जीपणामुळे आदिवासी महिलेची खासगी रुग्णालयात प्रसूती




सरकारी दवाखाने हे खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेच्या सेवेसाठी असतात मात्र या ठिकाणी डॉक्टर आणि इतर अधिकारी कर्मचारी हे मुख्यालयाच्या ठिकाणी राहत नसल्यामुळे रुग्णांची सातत्याने गैरसोय होते ५० खाटाचे रुग्णालय आणि प्रशिक्षित उच्चशिक्षित अधिकारी कर्मचारी असताना एका गरीब आदिवासी महिलेची खाजगी दवाखान्यामध्ये प्रसूती करावी लागणे हे लज्जास्पद आहे. संबंधित वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना तात्काळ निलंबित करावे तसेच उपजिल्हा रुग्णालयातील सर्व रिक्त जागा तात्काळ भराव्या नसता वैद्यकीय अधीक्षकाच्या दालनाला टाळे ठोकू.

**– वाल्मिक शिरसाठ**
**अध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद प्रतिष्ठान गंगापूर**

**अक्षराज : जितेंद्र लिंगायत**

**दि.१२, गंगापूर (छ.संभाजीनगर) :** नेवरगाव येथील आदिवासी समाजातील देवयानी शुभम गायकवाड या महिलेला शुक्रवारी पहाटे प्रसूतीसाठी दाखल करण्यात आले होते उपजिल्हा रुग्णालय, गंगापूर येथील डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे खासगी रुग्णालयात प्रसूती करावी लागल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे.

आज पहाटे सुमारे ४ वाजण्याच्या दरम्यान देवयानी गायकवाड यांना प्रसूतीसाठी उपजिल्हा रुग्णालय, गंगापूर येथे दाखल करण्यात आले होते.

मात्र, कर्तव्यावरील डॉक्टर व परिचारिका यांनी सुरुवातीला तपासणी करण्यास टाळाटाळ केल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. वारंवार विनंती केल्यानंतर तपासणी करून सदर प्रसूती येथे होणार नसल्याचे सांगण्यात आले व रुग्णास घाटी रुग्णालय अथवा खासगी रुग्णालयात हलविण्याचा सल्ला देण्यात आला.

रुग्णाचे कुटुंब आर्थिकदृष्ट्या दुर्बल असून ते आदिवासी समाजातील आहे. त्यामुळे शासकीय रुग्णालयातच प्रसूती करून द्यावी, अशी विनंती नातेवाईकांनी केली. मात्र, त्यास प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी नाईलाजाने शहरातील एका खासगी रुग्णालयात रुग्णास दाखल केले. तेथे आज दुपारी तिची सुखरूप प्रसूती झाली असून माता व बाळ दोघांचीही प्रकृती उत्तम आहे.

या घटनेमुळे शासनाच्या सुरक्षित मातृत्व व संस्थात्मक प्रसूती योजनांच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# मिलन चौकातील SBI एटीएम गॅस कटरने फोडण्याचा प्रयत्न

## चोरट्यांचा दुसऱ्यांदा अयशस्वी प्रयत्न; एटीएमच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि १३, नागपूर :** खापरखेडा-दहेगाव राष्ट्रीय महामार्गावरील मिलन चौक परिसरात आज पुन्हा एकदा बँकेच्या सुरक्षा व्यवस्थेला आव्हान देणारी घटना समोर आली आहे. या परिसरातील स्टेट बँक ऑफ इंडियाचे (SBI) एटीएम केंद्र अज्ञात चोरट्यांनी गॅस कटरने कापून फोडण्याचा प्रयत्न १२ जून २०२६ रोजी पहाटेच्या सुमारास केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे याच एटीएमवर चोरीचा हा दुसरा प्रयत्न असल्याने बँकेच्या सुरक्षेचे तीन तेरा वाजले आहे. मिळालेल्या माहितीनुसार मिलन चौकातील रुपेश सावरकर यांच्या घराजवळएसबीआयचे एटीएम केंद्र आहे. दिनांक १२ जून रोजी पहाटेच्या सुमारास



अज्ञात चोरट्यांनी एटीएम केंद्रात प्रवेश केला. चोरट्यांनी सोबत आणलेल्या गॅस कटरच्या साहाय्याने एटीएम मशीन कापून आतील रोकड लंपास करण्याचा प्रयत्न केला.

यापूर्वी २० सप्टेंबर २०२५ रोजी याच एटीएम केंद्रावर चोरीचा अयशस्वी प्रयत्न झाला होता. राष्ट्रीय महामार्गावर अनेक बँक व कंपन्यांचे एटीएम आहेत. मात्र, एटीएम केंद्रावर रात्रीच्या वेळी सुरक्षारक्षक व अलार्म सिस्टीम सक्रिय नाही त्यामूळे बँकेच्या व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे व्यापारी आणि स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून पोलिसांनी या भागात रात्रीची गस्त वाढवावी व बँकेने चोवीस तास सुरक्षारक्षक नेमावा अशी मागणी जोर धरत आहे.

मात्र, चोरट्यांना मशीन पूर्णपणे तोडता आली नाही. सकाळच्या सुमारास नागरिकांना एटीएम केंद्र गॅस कटरने तोडलेल्या अवस्थेत आढळून आले. सदर घटनेची माहिती खापरखेडा पोलीसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिष रुमकर यांनी दिलेल्या माहितीनुसार एटीएमम धील रोकड चोरीला गेलेली नाही त्यामुळे मोठी हानी टळली असल्याचे सांगितले. पोलिसांनी घटनास्थळावरून व परिसरातील सीसीटीव्ही (CCTV) फुटेज ताब्यात घेतले असून संशयित चोरट्यांचा शोध घेणे सुरू केले आहे. सदर प्रकरणात आरोपी लवकरच गजाआड होतीलबअसा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# अक्षराजच्या बातमीची दखल; नगरसेविका पाटील ॲक्शनमध्ये

## विनोद वास्कर यांच्याही मागणीला यश, वेशीआई शौचालयाला बसले ६ नवीन दरवाजे

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१३, शिळगांव, (ठाणे) :** शिळगावातील वेशीआई मंदिराजवळील ठामपा सार्वजनिक शौचालयाचे दरवाजे चोरीला गेल्याने महिला आणि ज्येष्ठ नागरिकांची होणारी कुचंबणा हा गंभीर प्रश्न अक्षराज मीडियाने १८ मे २०२६ रोजी सर्वप्रथम ठळकपणे मांडला होता. महिलांच्या सन्मानाचा आणि सुरक्षेचा हा प्रश्न समोर आणल्यानंतर अखेर प्रशासन खडबडून जागे झाले.

या प्रश्नासाठी समाजसेवक विनोद वास्कर यांनी ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव, महापौर आणि दिवा प्रभाग समिती सहाय्यक आयुक्त यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या पाठपुराव्याला अखेर यश आले.

अक्षराजच्या या एक्सक्लुझिव्ह वृत्तानंतर एकोणीस मे रोजी 'पुढारी' आणि सत्तावीस मे रोजी लोकमतच्या



क्विक णविरींश मध्येही या प्रश्नाला वाचा फोडण्यात आली. विनोद वास्कर यांनी दरवाजे बसवणे, २४ तास पाणी-वीज आणि रस्ता दुरुस्तीची मागणी लावून धरली होती.

**८ दिवसांत ठामपाची धडक कारवाई**

माध्यमांच्या आणि विनोद वास्कर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची दखल घेत ठामपा प्रभाग क्र. एकोणतीस च्या नगरसेविका सौ. वेदिका साहिल पाटील यांनी दोन जून २०२६ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीत चोरीला गेलेले ६ दरवाजे, जीर्ण झालेली स्वच्छतागृह, अनियमित पाणीपुरवठा आणि खडबडीत रस्त्याचा आढावा घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश दिले.

नगरसेविका वेदिका पाटील यांनी दिवा प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्त, सार्वजनिक बांधकाम अभियंता दीपक माने आणि आरोग्य विभाग अभियंता चंद्रकांत वायतोंडे यांना चोरीला गेलेले ६ शौचालयांचे दरवाजे तातडीने बसवणे, २४ तास पाणी-वीज उपलब्ध करून देणे आणि रस्ता दुरुस्ती करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

त्यांच्या आदेशाची दखल घेत ठाणे महानगरपालिकेने आठ दिवसांमध्ये धडक कारवाई करत ९ जून २०२६ रोजी वेशीआई मंदिराजवळील सार्वजनिक शौचालयाला नवीन ६ दरवाजे बसवले आहेत.

वेदिका पाटील म्हणाल्या, हा प्रश्न सर्वात अगोदर अक्षराज मीडियाने १८ तारखेला मांडला होता. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न असल्याने त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. अक्षराजच्या आणि विनोद वास्कर यांच्या पाठपुराव्यामुळेच प्रशासन खडबडून जागे झाले. स्वच्छ शिळगाव - सुंदर शिळगाव ही आमची संकल्पना आहे. आपलं सहकार्य, आपलं गाव, आपली जबाबदारी!

अक्षराज मीडियाच्या पाठपुराव्यामुळे महिलांना मिळालेल्या या दिलास्यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. समाजसेवक विनोद वास्कर यांच्या पाठपुराव्याचेही सर्वत्र कौतुक होत आहे.

# निळजे-डोंबिवली बससेवा सुरू; मनसेच्या पाठपुराव्याने नागरिकांना दिलासा

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१३, डोंबिवली (ठाणे) :** लोढा हेवन ते डोंबिवली रेल्वे स्थानक या मार्गावरील बंद झालेली बससेवा अखेर पुन्हा सुरू झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून ही सेवा बंद असल्याने निळजे परिसरातील हजारो नागरिकांना प्रचंड गैरसोय सहन करावी लागत होती. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या आक्रमक पाठपुराव्यामुळे आजपासून ही सेवा पूर्ववत झाली आहे.

मनसेचे सन्माननीय माजी आमदार प्रमोद (राजूदादा) पाटील यांच्याकडे स्थानिक नागरिकांनी बससेवा बंद झाल्याची व्यथा मांडली होती. शाळा-कॉलेजला जाणारे विद्यार्थी, नोकरीसाठी डोंबिवली स्टेशनवर अवलंबून असणारे नोकरदार आणि ज्येष्ठ नागरिक यांची दैनंदिन धावपळ वाढली होती. नागरिकांची रास्त मागणी लक्षात घेऊन राजूदादा पाटील यांनी परिवहन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तातडीने पाठपुरावा केला आणि लेखी पत्राद्वारे लक्ष वेधले. अधिकाऱ्यांनी मार्गाची प्रत्यक्ष पाहणी करून स्थानिक पदाधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर आजपासून बससेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला.



**अतिक्रमण-फेरीवाल्यांवर मनसेचा इशारा**

बससेवेचा मार्ग सुरळीत ठेवण्यासाठी मनसे पदाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांसोबत बैठक ही घेतली. या मार्गावर वाढले अतिक्रमण, फेरीवाल्यांचा वाढता त्रास आणि अवैध पार्किंगमुळे होणारी वाहतूक कोंडी यावर सविस्तर चर्चा झाली. बससेवा नियमितपणे सुरू राहावी यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. याचबरोबर ठाणे महापालिकेच्या अधिकाऱ्यांना मनसेने इशारा दिला आहे की, फेरीवाले आणि अवैध पार्किंगमुळे ही सेवा पुन्हा ठप्प झाली तर महाराष्ट्र नवनिर्माण सेना रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडेल. त्यामुळे होणाऱ्या कोणत्याही परिस्थितीस प्रशासन जबाबदार राहील.

**पहिल्या फेरीला जल्लोष**

आज सुरू झालेल्या पहिल्या बस फेरीचे नागरिकांनी स्वागत केले. मनसेचे उपजिल्हाध्यक्ष योगेश पाटील, विभाग अध्यक्ष रोहित भोईर, विभाग सचिव दीपक पवार, समाजसेवक निवृत्ती पाटील, विभाग सचिव पुष्पाताई भोर, वाहतूक सेनेचे अनुज दिवेकर, उपविभाग अध्यक्ष अशोक गायकर, शाखाध्यक्ष राजेश काशीकर यांच्यासह असंख्य पदाधिकारी आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते. चालक आणि वाहकांचा सत्कार करून नारळ वाढवून या नव्या प्रवासाला शुभेच्छा देण्यात आल्या.

**नागरिकांच्या सेवेसाठी मनसे तत्पर**

नागरिकांच्या छोट्या-मोठ्या प्रश्नांसाठी मनसे नेहमीच रस्त्यावर उतरते. निळजे-डोंबिवली बस ही केवळ बस नाही, तर हजारो कुटुंबांची सोय आहे. ती सुरू करून देणे ही आमची जबाबदारी होती आणि आम्ही ती पार पाडली, अशी प्रतिक्रिया यावेळी पदाधिकाऱ्यांनी दिली.

# लक्ष्मी टाकळीत अवैध दारू विक्रीवर पोलिसांची धाड

## १६,०३० रुचा मुद्देमाल जप्त, शरद रणदिवे अटकेत



**अक्षराज: विकास सरवळे**

**दि.१३, पंढरपूर :** सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे (भा.पो.से.) यांच्या पथकाने लक्ष्मी टाकळी येथे अवैध दारू विक्री करणाऱ्या इसमावर कारवाई करत ₹१६,०३० किंमतीचा देशी-विदेशी दारूचा साठा जप्त केला आहे. दिनांक १३ जून २०२६ रोजी सायंकाळी ४:०० वा. च्या सुमारास सपोअ प्रशांत डगळे यांना गोपनीय माहिती मिळाली की, लक्ष्मी टाकळी गावातील हॉटेल शाही दरबारच्या बाजूला एका पत्राशेडजवळ एक इसम अवैधपणे दारू विक्री करत आहे. माहिती मिळताच सपोअ डगळे यांनी पोलीस पथकासह श्रीराम नगरकडे जाणाऱ्या कच्च्या रोडवरील पत्राशेडजवळ धाव घेतली. तेथे एक इसम पांढऱ्या रंगाची पिशवी घेऊन थांबलेला दिसला. संशय आल्याने पोलिसांनी त्यास गराडा घालून ताब्यात घेतले. आरोपीचे नाव: शरद बाळासाहेब रणदिवे, रा.क्रांतिवीर लहुजी वस्तादनगर, टाकळी रोड, पंढरपूर. पिशवीत देशी-विदेशी दारूच्या बाटल्या, एकूण किंमत ₹१६,०३० याप्रकरणी पोहेकॉ/१७३१ ताजुद्दीन मुजावर यांनी पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५ (ई) प्रमाणे फिर्याद दिली आहे.

तालुक्यातील जनतेला आवाहन केले आहे की, आपल्या गावामध्ये अशा प्रकारचे अवैध धंदे चालू असल्यास आम्हास संपर्क करावा. यापुढे कोणीही बेकायदेशीर कृत्य अथवा अवैध धंदे सुरू ठेवल्यास अशा समाजविघातक लोकांवर प्रचलित कायद्यानुसार अत्यंत कडक कारवाई केली जाईल. अशा लोकांची यापुढे गय केली जाणार नाही.

**- सपोअ प्रशांत डगळे(पंढरपूर)**

# थोडक्यात

## विजेच्या लपंडावाने जनता वैतागली; वीज पुरवठा सुरळीत ठेवण्याची मागणी



**अक्षरज : प्रतिनिधी**

**दि.१३, पोभुर्णा (चंद्रपूर) :** पोभुर्णा तालुक्यातील देवाडा बुजरुक जुनगाव परिसरात वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असुन विजेच्या लपंडावाने जनता आता वैतागली असल्याचे चित्र समोर येताना दिसत आहे वार वादळ पाऊस विजेचा कडकडाट या सर्व बाबी नसताना देखील वारंवार विज पुरवठा खंडित होत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे घरगुती विजपुरवठा नेहमी चालू बंद होत असल्याने गर्मीचया दिवसात उकाडा सहन करुन रात्र काढण्याची पाळी येत असून विजग्रहाने नाकीनऊ होऊन कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे. वास्तविकता नियमित विजपुरवठा सुरळीत ठेवने हे माहवितरण कंपनीचे उदिष्ट असले तरी याकडे मात्र डोळेझाक होताना दिसत आहे एखादा विजग्राहक विज बिलाची पुर्णतः केली नसेल तर त्वरीत विज कापली जाते तर विज पुरवठा चोवीस तास का ठेवल्या जात नाही असा सवाल विज ग्राहकांकडून विचारल्या जात आहे वारंवार विजेचा लपंडाव होत असल्याने नागरीक त्रस्त झाली असुन मानसिकता खालविलयाची बाब समोर येऊन असंतोष जनक वातावरण निर्माण होत आहे तेव्हा विज वितरण कंपनीने याकडे गांभीर्याने लक्ष केंद्रित करून परिसरातील विजपुरवठा सुरळीत चालू ठेवणयात यावा अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## (चिचोली) खापरखेडा येथील नवनिर्मित पाण्याच्या टाकीत मुले करताहेत आंघोळ



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१३, नागपूर :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या जलजिवन मिशन योजना अंतर्गत चिचोली (खापरखेडा) ग्रामपंचायत हद्दीत कोट्यावधी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू आहे. सदर टाकीचे निर्माण कार्य पूर्ण झाले असून टेस्टिंगसाठी पाणी भरण्यात आले होते. मात्र, सदर पाण्याच्या टाकीत चिचोली वार्ड क्रमांक १ परिसरातील अल्पवयीन मुले थेट उतरून पोहत व आंघोळ करत असल्याचा एक धक्कादायक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून एखादी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र स्थानिक ग्रामपंचायत प्रशासन मुंग गिळून बसले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार जलजिवन मिशन योजना अंतर्गत ११ कोटी ७७ लाख ८५ हजार १२२ रुपयांचा पाण्याच्या टाकीचा प्रकल्प आहे. सदर पाण्याची टाकी अद्याप पूर्णपणे कार्यान्वित झालेली नाही, मात्र टेस्टिंगसाठी भरलेल्या पाण्यात मुले आपला जीव धोक्यात घालून पोहण्यासाठी आणि आंघोळीसाठी जात आहेत. चिचोली ग्रामपंचायत प्रशासनाने यापूर्वी अनेकदा सूचना दिल्या आहेत. शिवाय मुलांना मज्जाव ही केला आहे. मात्र, पाण्याच्या टाकी परिसरात कोणत्याही प्रकारची सुरक्षा नसल्याने एखाद्याचा पाय घसरून किंवा पाण्यात बुडून अनुचित प्रकार घडल्यास याला जबाबदार कोण? असा प्रश्न सर्वसामान्य नागरीक विचारत आहे.भविष्यात सदर टाकीच्या माध्यमातून चिचोली वार्ड क्रमांक १ परिसराला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जाणार आहे. जर हाच प्रकार भविष्यातही सुरू राहिला तर नागरिकांना दूषित पाण्याचा पुरवठा होऊन त्यांच्या आरोग्याशी खेळ खेळला जाण्याची दाट शक्यता आहे. हा व्हिडिओ समोर आल्यानंतर आता तरी प्रशासनाने जागे व्हावे एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी चिचोली ग्रामपंचायत प्रशासन व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने पाण्याच्या टाकीभोवती सुरक्षा तैनात करावी अशी मागणी केल्या जात आहे.

**पाण्याच्या टाकी परिसरात चालतात अवैध धंदे**

जलजिवन मिशन योजना अंतर्गत असलेल्या पाण्याच्या टाकी भोवती सुरक्षा भिंत आहे, मात्र गेट लावण्यात आले नाही. पाण्याच्या टाकी अवैध धंदेवाल्यासाठी आश्रय बनली असून या ठिकानावावरून गांजा व दारू विक्री केल्या जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. शिवाय जंगल झुडपे वाढली आहे त्यामूळे सुरक्षेच्या दृष्टीकोनातून उपाययोजना करणे महत्वाचे आहे.

## संताजी जगनाडे महाराजांचे जीवन समाजप्रबोधनाचे प्रेरणास्थान -आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांनी आपल्या कार्यातून समाजाला समता,श्रमप्रतिष्ठा आणि मानवतेची शिकवण दिली. संत तुकाराम महाराजांच्या अभंगांचे जतन करून त्यांनी संत साहित्याच्या संवर्धनात मोलाचे योगदान दिले. त्यांचे जीवन आणि कार्य आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असूनसंताजी जगणाडे महाराजांचे जीवन समाजप्रबोधनाचे प्रेरणास्थानआहेअसे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले. समाजसेवक राजेश बेले यांच्या पुढाकारातून सकल तेली समाजाच्या वतीने पंच तेली हनुमान मंदिर येथे आयोजित संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज चंद्रपूर ते पंढरपूर पायदळ पालखी वारी सोहळा व सत्कार समारंभात ते बोलत होते.यावेळी राजेश बेले,डॉ.संजय बेले,डॉ.नामदेव वर्भे, बलराम डोडाणी,निलेश बेलखेडे,रोहन घोंगडे, सोहम बुटले,नगरसेवक रवि लोणकर, वर्धन चौरे, गणेश येरणे, आकाश साखरकर, प्रशांत मुळे, अक्षय घटे,श्रुती घटे,मिनाश्री गुडेकर, सुवर्णा लोखंडे, चंदा इटनकर, पौर्णिमा मेहकुरे,अनिता निमगडे,अनिता वैरागडे, कल्पना महुलकर,कोकीला पोटदुखे,कविता झुमरे आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार किशोर जोरगेवार म्हणाले की,महाराष्ट्राच्या संत परंपरेने समाजाला सदैव योग्य दिशा दिली आहे. संत ज्ञानेश्वर,संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, संत चोखामेळा यांच्यासह संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांनीही समाजप्रबोधनाचे महान कार्य केले. त्यांनी भक्ती आणि मानवतेचा संदेश देत समाजातील सर्व घटकांना एकत्र आणण्याचे कार्य केले.संताजी जगनाडे महाराजांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली.

समाजातील सामान्य माणसाच्या जीवनाशी एकरूप होत त्यांनी समतेचा विचार रुजविला. संत तुकाराम महाराजांच्या अभंगांचे संकलन व जतन करून त्यांनी वारकरी साहित्य आणि संत परंपरेच्या जतनासाठी अमूल्य योगदान दिले. त्यामुळे त्यांचे कार्य केवळ एका समाजापुरते मर्यादित नसून संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी ठरले आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात वाढत असलेला तणाव, मतभेद आणि स्वार्थीपणा दूर करण्यासाठी संतांचे विचार अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे. प्रेम, करुणा, समता आणि बंधुभावाचा संदेश प्रत्येकाने आपल्या जीवनात अंगीकारल्यास समाज अधिक सुदृढ आणि संस्कारक्षम बनेल,असेही आमदार जोरगेवार यांनी सांगितले.